# परिशिष्ट

# प रि शि ष्ट १.

## इयत्ता ९ वी च्या वर्गातील विद्यार्थ्यांच्या मराठी लेखनातील दोषांचा

## चिकित्सक अभ्यास

## शिक्षक प्रश्नावली

प्रश्नावली भरण्यासंबंधीच्या सूचना -

१) काही प्रश्नांच्या विधानापुढे होय किंवा नाही असे दोन पर्याय आहेत. त्यापैकी योग्य पर्याय ठेवावा. नको असलेल्या पर्यायावर फुली मारावी.

२) काही ठिकाणी कारणे दिलेली आहेत. योग्य कारणापुढे ( ✓ ) अशी खूण करावी.

३) दिलेली विधाने/कारणे/त्रुटी यांच्याव्यतिरिक्त अधिक माहिती द्यावयाची झाल्यास ती त्या प्रश्नाखाली मोकळ्या सोडलेल्या जागी थोडक्यात द्यावी.

१) अध्यापकाचे नाव :

२) शाळेचे नाव व पत्ता :

३) शैक्षणिक पात्रता :

४) पदवी परीक्षेचा मुख्य विषय :

५) पदव्युत्तर परीक्षेचा मुख्य विषय :

६) बी.एड्. ला असलेली अध्यापन पद्धती :

१)

२)

७) इयत्ता ९वी च्या वर्गाला मराठी शिकविण्याचा
अनुभव :            वर्षे

१(अ) इयत्ता ९वी च्या वर्गातील विद्यार्थ्यांच्या मराठी लेखनात ज्या चुका आढळतात, त्यापैकी काही पुढे दिल्या आहेत. आपण सहमत असलेल्या चुकांसमोर ( ✓ ) अशी खूण करावी.

१) ऱ्हस्व-दीर्घाच्या चुका लेखनात केल्या जातात.    होय  नाही

उदा. मि, परिक्षा, पाहीजे, हीत, आणी इ.

२) आवश्यक अनुस्वार गाळतात.

उदा. इद्र, अक, चचल, सवाद इ.

३) अनावश्यक अनुस्वार देतात.

उदा. लांकूड, नांव, मोर्ती घांट इ.

४) अनेकवचनाचा द्योतक अनुस्वार गाळतात.

उदा. घरात, त्याना, मुलाना, शिक्षकाना इ.

५) मात्रालेखनात चुका करतात.

उदा. एकणे, देत्य, सेन्य इ.

६) चुकीचे अक्षर लिहितात.

उदा. रुण, ग्राह, क्रिष्ण इ.

७) जोडाक्षर लेखनात चुका करतात.

उदा. पल्हाद, क्रष्ण, दिष्टी, आशर्वाद, रगत इ.

८) जोडशब्द लेखनात चुका करतात.

उदा. दैत्य कुलोत्पन्न, राज्यश्रेष्ट, शील संपन्न इंद्रपद, यथा योग्य इ.

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY KOLHAPUR

९) विसर्ग लेखनात चुका करतात.
उदा. दुख, बुद:धी, सवतां इ.

१०) विरामचिन्हांचा वापरात चुका करतात.

११) अवतरण चिन्हांचा वापर करीत नाहीत.

१२) परभाषेतील शब्दांच्या लेखनात चुका करतात.
उदा. ब्यॅट, किरकेट, खाट इ.

यांच्याव्यतिरिक्त आणखी कोणत्या प्रकारच्या चुका आढळतात त्या सोदाहरण सांगा -

(ब) आपल्या मते लेखन दोष होण्याची पुढे नमूद केलेल्या कारणांपैकी कोणती कारणे आहेत. आपण सहमत असल्यास/नसल्यास होय/नाही यापैकी योग्य पर्याय ठेवावा.

| | | |
|---|---|---|
| १) | लेखन लक्षापूर्वक करीत नाहीत. | होय/नाही. |
| २) | विद्यार्थ्यांच्या लेखनदोषाकडे व्यक्तिगत लक्ष दिले जात नाही. | होय/नाही. |
| ३) | उचित लेखनासाठी मार्गदर्शनाचा अभाव दिसून येतो. | होय/नाही. |
| ४) | संयुक्त अक्षरे लिहिता येत नाहीत. | होय/नाही. |
| ५) | शब्दांचे उच्चार चुकीचे करतात म्हणून दोष येतात. | होय/नाही. |
| ६) | लेखन नियमांचे अज्ञान असते. | होय/नाही. |
| ७) | लेखनाबाबत विद्यार्थी उदासीन असतात. | होय/नाही. |

८) वाचन लक्षपूर्वक करण्याची विद्यार्थ्यांना सवय नसते. होय/नाही.

९) पूर्व वर्गातून (इ.५ वी ते ८ वी) विद्यार्थ्यांच्या निर्दोष लेखनाकडे शिक्षकांनी लक्ष दिलेले नाही. होय/नाही.

१०) विद्यार्थ्यांचे हस्ताक्षर सुवाच्य व स्पष्ट नसते त्यामुळे लेखनदोष होतात. होय/नाही.

११) भाषेखेरीज अन्य विषयांचे अध्यापक निर्दोष लेखनाकडे दुर्लक्ष करतात. होय/नाही.

१२) मराठीचे लेखननियम अवघड व गुंतागुंतीचे आहेत. होय/नाही.

दिलेल्या कारणांव्यतिरिक्त अन्य कारणे असल्यास ती पुढे दिलेल्या मोकळ्या जागेत लिहावीत.

(क) विद्यार्थ्यांच्या लेखनात चुका होऊ नयेत यासाठी खालीलपैकी कोणती उपाययोजना करता येईल. आपण सहमत असलेल्या उपायापुढे (✓) अशी खूण करावी.

१) श्रुतलेखन व अनुलेखन यासाठी स्वतंत्र तासिका ठेवणे.

२) कठीण शब्दांचे उच्चार विद्यार्थ्यांकडून कंठस्थ करून घेणे.

३) स्वत:चे लेखन स्वत: तपासण्याची व त्यातील दोषांची दुरुस्ती करण्याची सवय विद्यार्थ्यांना लावणे.

४) पाठ्यक्रम शिकविताना त्यात येणाऱ्या नव्या व कठिण शब्दांचे लेखन जाणीवपूर्वक शिकविणे.

५) विद्यार्थ्यांच्या लेखनाकडे व्यक्तिगत लक्ष देणे व उचित मार्गदर्शन करणे.

६) लेखनाचे आदर्श नमुने विद्यार्थ्यांच्या पुढे ठेवणे.

७) विद्यार्थ्यांसाठी निर्दोष लेखनाच्या स्पर्धा आयोजित करणे.

८) वारंवार ज्या शब्दांच्या चुका होतात त्या शब्दांचे तक्ते वर्गात लावणे.

९) लेखन नियमांचे सोदाहरण तक्ते वर्गात लावणे.

१०) उच्चारण सदोष असल्यास लेखन सदोष होते म्हणून उच्चारणाकडे लक्ष देणे.

११) शिक्षकांचे वाचन/लेखन निर्दोष असणे आवश्यक.

१२) निर्दोष लेखनासाठी स्वतंत्र गुण ठेवणे.

वर दिलेल्या प्रश्नांतून विचारली न गेलेली तथापि या संशोधन प्रबंधास उपयुक्त ठरणारी आणखी काही माहिती द्यावयाची असल्यास ती येथे (खाली) नमूद करावी.

सहकार्याबद्दल धन्यवाद.

.......

# परिशिष्ट 2

## अध्यापकांच्या अनौपचारिक मुलाखतीसाठी विचारलेले प्रश्न -

१) विद्यार्थ्यांच्या लेखनात चुका होतात याविषयी कोणकोणती कारणे सांगता येतील ?

२) अध्यापन करीत असताना विद्यार्थ्यांचे लेखन निर्दोष व्हावे या भूमिकेतून अध्यापक जाणीवपूर्वक अध्यापन करतात काय ? याबाबतचे आपले निरीक्षण काय आहे ?

३) स्वत:चे लेखन निर्दोष आहे असा आत्मविश्वास अध्यापकांच्या ठिकाणी आढळतो काय ? निर्दोष लेखनासंबंधी अध्यापकांची भूमिका कोणत्या प्रकारची आहे ?

४) विद्यार्थ्यांचे लेखन निर्दोष होण्याबाबतची जबाबदारी केवळ मराठी विषयाच्या अध्यापकांची आहे काय ? अन्य अध्यापकांची लेखनाबाबतची कोणती दृष्टी असते ? याबाबत आपला अनुभव काय आहे ?

५) विद्यार्थ्यांचे लेखन निर्दोष व्हावे यासाठी शाळांतून कोणकोणते उपक्रम अध्यापक प्रत्यक्ष अवलंबिताना आढळतात ?

६) विद्यार्थ्यांचे लेखन निर्दोष व्हावे यासाठी आणखी कोणते उपाय (वरील उपायांखेरीज) अवलंबावेत असे आपणास वाटते ?

७) लेखनाचे अध्यापन करताना कोणत्या अडचणी संभवतात असे आपणास वाटते ? या अडचणी दूर करण्यासाठी आपण कोणते उपाय सूचवाल ?

८) निर्दोष लेखनाचे कौशल्य आत्मसात करण्याच्या दृष्टीने विद्यार्थ्यांच्या मध्ये कोणत्या उणीवा आपणास आढळतात ?

९) या उणीवा दूर करण्यासाठी आपण कोणते उपक्रम सूचवाल ?

१०) मराठी विषयाच्या अभ्यासक्रमात लेखन अध्यापनअध्ययनाला पुरेसे स्थान आहे काय ? याबाबत आपले मत काय आहे ?

११) लेखनाच्या अध्यापनाच्यादृष्टीने अभ्यासक्रमात आपण काही दुरुस्ती सुचवाल काय ?

१२) पाठ्यपुस्तकामध्ये पाठानंतर "भाषाभ्यास व लेखन" यांचा समावेश केलेला असतो. अध्यापक याविभागाचे अध्यापन जाणीवपूर्वक करतात काय ? याविषयी आपला अनुभव काय आहे ?

१३) पाठ्यपुस्तकातील या विभागाचे अध्यापन करण्याकडे अध्यापक दुर्लक्ष करीत असतील तर त्याची कोणती कारणे असावीत ?

१४) चाचणी परीक्षेच्या उत्तरपत्रिका, गृहपाठ, दैनंदिन लेखन यांची तपासणी करताना अध्यापक विद्यार्थ्यांचे लेखन काटेकोरपणे तपासून त्याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतात काय ?

१५) शिक्षणशास्त्र पदवीपरीक्षेच्या अंतर्गत "मराठी अध्यापनपध्दती"च्या प्रश्नपत्रिकेत निर्दोष लेखनासंबंधीच्या ज्ञानाचा आणि लेखनाच्या अध्यापनपध्दतीचा असणारा अभ्यासक्रम आपणास पुरेसा वाटतो काय ? त्यात काही सुधारणा आवश्यक वाटतात काय ? कोणत्या स्वरूपांच्या ?

१६) भाषेच्या अध्यापकांसाठी निर्दोषलेखन स्वरूप, अध्यापन "तंत्र व पध्दती" यासाठी सेवांतर्गत प्रशिक्षण, कृतीसत्रे घेणे उपयुक्त ठरेल काय ?

१७) विद्यार्थ्यांचे लेखन निर्दोष होण्यासाठी पालकांचा सहभाग घेता येईल काय ? तो कोणत्या स्वरूपाचा असावा.

.......

# परिशिष्ट ३

## प्रश्नावली भरून देणाऱ्या शिक्षकांची यादी

| अ.नं. | शिक्षकाचे नाव | शाळा | शै.पात्रता | अध्यापन अनुभव वर्षे |
|---|---|---|---|---|
| १) | श्री. केसरकर पी.डी. | कुमारभवन,शेणगाव. | बी.ए.बी.पी.एड्. | ३ |
| २) | सौ. देवाळे दिपलता द. | सौ.जेबिलिना गर्ल्स हायस्कूल, गारगोटी. | एम्.ए.,बी.एड्. | ४ |
| ३) | श्री. पोरे पी.जी. | न्यू इंग्लिश स्कूल,गारगोटी. | एम्.ए.,बी.एड्. | १२ |
| ४) | " खापरे बा.ना. | दौलत विद्यामंदिर,मडिलगे. | डी.आर.एस्.७ एज्यु. | १२ |
| ५) | सौ. निकम ए.बी. | न्यू इंग्लिश स्कूल,गारगोटी. | एम्.ए.,एम्.एड्. | १० |
| ६) | सौ. राजाज्ञा एन्.बी. | शाहूकुमार भवन,गारगोटी. | एम्.ए.,बी.एड्. | १९ |
| ७) | श्री. देसाई दत्तात्रय ब. | दौलत विद्यामंदिर,मडिलगे. | बी.ए.,बी.एड्. | १५ |
| ८) | सौ. देसाई क.सु. | शाहूकुमार भवन, गारगोटी. | एम्.ए.,एम्.एड्. | ११ |
| ९) | श्री. लोखंडे यु.डी. | कुमारभवन, शेणगाव. | एम्.ए.,डी.एड्. | २ |
| १०) | श्री. देसाई बी.पी. | कुमारभवन, करडवाडी. | एम्.ए.,बी.एड्. | ६ |

# परिशिष्ट ४

## अनौपचारिक मुलाखत घेतलेल्या शिक्षकांची यादी

| अ.नं. | शिक्षकाचे नाव | शाळा | शै.पात्रता | अध्यापन अनुभव वर्ष |
|---|---|---|---|---|
| १. | श्री.कौलवकर एस्.व्ही. | शाहूकुमार भवन, गारगोटी. | डी.आर.एस्. एज्यु. | १४ |
| २. | श्री.देसाई के.अे. | कुमारभवन, पुष्पनगर. | बी.ए.,बी.एड्. | ७ |
| ३. | श्री.नलवडे एस्.आर. | जवाहर हायस्कूल, निळपण. | डी.आर.एस्. एज्यु. | १७ |
| ४. | श्री.मोरे व्ही.एस्. | शंकरराव देसाई हायस्कूल, म्हसवे. | बी.ए.,बी.एड्. | ३० |
| ५. | सौ.मोरे एस्.व्ही. | शंकरराव देसाई हायस्कूल, म्हसवे. | बी.ए.,बी.एड्. | ३० |
| ६. | सौ. निंबाळकर एस्.अे. | कुमारभवन, कूर. | बी.ए.,बी.एड्. | ६ |
| ७. | श्री. मेंगाणे एस्.के. | कुमारभवन, शेळोली. | बी.ए.,बी.एड्. | १ |
| ८. | श्री.सातवेकर आर.बी. | मौनी महाराज हायस्कूल, पोटगाव. | बी.ए.,बी.एड्. | ७ |
| ९. | श्री. कांबळे पी. एस. | कुमार भवन, कूर. | बी.ए.,बी.एड. | ९ |
| १० | श्री. धुमाळ अे. एच. | शाहूकुमार भवन, गारगोटी | बी.ए.बी.एड. | १२ |

# परिशिष्ट ५

संशोधनासाठी ज्या शाळांतील इयत्ता नववीच्या वर्गातील विद्यार्थ्यांची निवड केली त्या शाळांची यादी -

१) श्री. शाहूकुमार भवन, गारगोटी, ता.भुदरगड, जि. कोल्हापूर

२) न्यू इंग्लिश स्कूल, गारगोटी, ता. भुदरगड, जि. कोल्हापूर

३) सौ. जेबिलिना गर्ल्स हायस्कूल, गारगोटी, ता. भुदरगड, जि. कोल्हापूर.

........